# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 11 February 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- विद्यार्थ्यांची क्षमता, अंगभूत कौशल्य आणि कामातला आनंद या गोष्टींना अधिक महत्त्व देण्याचं पंतप्रधानांचं परीक्षा पे चर्चा कार्यक्रमातून आवाहन
- पंतप्रधान मोदी फ्रान्स दौऱ्यावर, आज भूषवणार कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेचं सह अध्यक्षपद
- छत्रपती संभाजीनगर इथं जीवन प्राधिकरण अंतर्गत एक हजार १६४ योजनांची कामं जलदगतीने पूर्ण करण्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांचे निर्देश
- आजपासून बारावीची परीक्षा – छत्रपती संभाजीनगर विभागात एक लाख ८५ हजारावर विद्यार्थ्यांची नोंदणी

आणि

- राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत १२९ पदकांसह महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर

****

विद्यार्थ्यांची क्षमता, अंगभूत कौशल्य आणि कामातला आनंद या गोष्टींना परीक्षेतले गुण, स्पर्धा आणि इतरांशी तुलना यापेक्षा अधिक महत्त्व देण्याचं आवाहन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात ते काल नवी दिल्लीत विद्यार्थ्यांशी बोलत होते. इतरांशी स्पर्धा करण्यापेक्षा स्वत:शीच स्पर्धा करावी, तसंच परीक्षेआधी तणाव येऊ न देता उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेऊन अभ्यास करण्याचा सल्ला पंतप्रधानांनी दिला. ते म्हणाले..,

***बॅटस्‌मन उस प्रेशर की परवाह नही करता, उसका पुरा ध्यान उस बॉल की ओर होता है। अगर आप भी इस प्रेशर को मन मे न लेते हुये अपना***

***ध्यान आज मैने इतना पढना तय किया था, ये अगर कर लेते है। आप आराम से उस प्रेशर मे से भी अपने आप को निकाल सकते है।***

परीक्षा पे चर्चा कार्यक्रमाचं स्वरुप आता बदललं असून तो, सात भागात सादर होणार आहे. आतापर्यंत बंद सभागृहात किंवा प्रेक्षागृहात होणारा हा कार्यक्रम काल नवी दिल्लीतल्या एका रोपवाटिकेत पार पडला. पंतप्रधानांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना तिळगूळ देऊन गोड बोलायचा संदेश दिला.
दरम्यान, या कार्यक्रमानंतर पंतप्रधान काल फ्रान्सच्या दौऱ्यावर रवाना झाले. पॅरिस इथं पोहोचल्यानंतर भारतीय समुदायानं त्यांचं भव्य स्वागत केलं. पॅरिसमध्ये आज आयोजित कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेचं पंतप्रधान, सह अध्यक्षपद भूषवणार आहेत.

**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत शालेय विद्यार्थ्यांसोबत 'परीक्षा पे चर्चा' हा कार्यक्रम पाहिला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एकप्रकारे जीवनाचा मंत्र मिळत असल्याचं ते म्हणाले.
छत्रपती संभाजीनगर इथं विविध शैक्षणिक संस्थांनी आपले विद्यार्थी तसंच शिक्षकांसाठी या कार्यक्रमाचं थेट प्रसारण दाखवण्याची व्यवस्था केली होती. सरस्वती भुवन प्रशालेतले विज्ञान शिक्षक मयूर साबळे आणि विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाबाबत आपलं मत या शब्दांत व्यक्त केलं..

**बाईट – मयूर साबळे, युवराज वायाळ, चैतन्य मोरे आणि वेदांत कुलकर्णी**

****

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात काल दोन्ही सभागृहात अर्थसंकल्पावर चर्चा झाली. राज्यसभेत माजी केंद्रीय अर्थमंत्री पी चिदंबरम यांनी या चर्चेला सुरुवात करताना, सरकारचं उत्पादन क्षेत्राविषयीचं धोरण अपयशी ठरल्याची टीका केली. त्याला उत्तर देताना भाजपा नेते जे पी नड्डा यांनी, सरकारनं उत्पादन क्षेत्रासाठी केलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली.
लोकसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेत सहभागी होत भाजपचे खासदार अनुराग ठाकूर यांनी, या अर्थसंकल्पात प्रत्येक क्षेत्रासाठी विक्रमी निधी देण्यात आला असून, राष्ट्रीय हिताची पुरेपूर काळजी घेण्यात आल्याचं नमूद केलं.

नोटबंदीच्या वेळी जाहीर केलेलं कोणतंही उद्दिष्ट साध्य करण्यात सरकार अपयशी ठरलं आहे, असं काँग्रेसच्या मनीष तिवारी यांनी सांगितलं. अर्थसंकल्पात दाखवलेल्या वित्तीय तुटीबद्दल त्यांनी सवाल उपस्थित केले. दोन्ही सभागृहात आजही ही चर्चा सुरु राहणार आहे.

****

जनगणनेला विलंब झाल्यामुळे देशातले जवळपास १४ कोटी लोक अन्न सुरक्षा कायद्याच्या लाभापासून वंचित राहिल्याचा आरोप, काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी केला आहे. राज्यसभेत त्या काल शून्य प्रहरात बोलत होत्या. सरकारने लवकरात लवकर जनगणना करावी अशी मागणी त्यांनी केली.

****

शेतकऱ्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी महाराष्ट्रासह विविध राज्यात सोयाबीन आणि इतर पिकांच्या खरेदीला मुदतवाढ दिली आहे. सामाजिक संपर्क माध्यमावरुन त्यांनी ही माहिती दिली. राज्यात २४ दिवसांसाठी सोयाबीन खरेदीला मुदतवाढ देण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

****

जलजीवन मिशन अंतर्गत छत्रपती संभाजीनगर इथं जीवन प्राधिकरण अंतर्गत एकूण एक हजार १६४ योजनांची कामं जलदगतीने पूर्ण करण्यासंदर्भातील कार्यवाहीचा, पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी काल आढावा घेतला. नळ पाणी पुरवठा अंतर्गत १०० टक्के नळ जोडणी पूर्ण झालेल्या ७१७ योजना असून, उर्वरित ४४० कामं पूर्ण करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश पाटील यांनी दिले.

****

राष्ट्रीय जंतनाशक दिनाच्या निमित्ताने राज्यात नांदेडसह पाच जिल्ह्यांत हत्तीरोग दुरिकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहिम राबवण्यात येत आहे. केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते या मोहिमेला प्रारंभ करण्यात आला, राज्यस्तरावर सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत या मोहिमेला सुरुवात झाली. या मोहिमेत हत्तीरोगग्रस्त नागरिकांनी सहभागी व्हावं, असं आवाहन आबिटकर यांनी केलं.

****

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या बारावीची परीक्षा आजपासून सुरू होत आहे. १८ मार्चपर्यंत ही परीक्षा चालेल. छत्रपती संभाजीनगर विभागात ४६० केंद्रांवर ही परीक्षा होत असून, एक हजार ४०८ महाविद्यालयातल्या एक लाख ८५ हजार ३३० विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली आहे. परीक्षेदरम्यान कॉपी मुक्त अभियानाअंतर्गत विद्यार्थ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार असून, गैरप्रकार टाळण्यासाठी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी परीक्षा केंद्रांच्या परिसरात परीक्षा कालावधीत जमावबंदी आदेश जारी केले आहेत.
हिंगोली जिल्ह्यात २४ संवेदनशील परीक्षा केंद्र असून, या केंद्रांवर विशेष लक्ष असल्याची माहिती, जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिली. जिल्हास्तरावर एका भरारी पथकासोबतच पाच तालुक्यांचं पाच भरारी पथक कार्यरत असेल.
नांदेड जिल्ह्यात १०७ केंद्रावर ४२ हजार ५२२ विद्यार्थी बारावीची परीक्षा देणार आहेत. विद्यार्थ्यांनी तणावमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी, असं आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केलं. जिल्ह्यातल्या संवेदनशील परिक्षा केंद्रावर केंद्र संचालक आणि पर्यवेक्षक बदलण्यात येणार असून, एकूण १० भरारी पथकं नेमण्यात आली आहेत.

****

सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणतीही तडजोड न करता कामं गुणवत्तापूर्ण आणि वेळेत पूर्ण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश विभागाचे मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले आहेत. धाराशिव इथं ते काल यासंदर्भातल्या बैठकीत बोलत होते. मुख्यमंत्र्यांचा १०० दिवसांचा सात कलमी कार्यक्रम सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रभावीपणे राबवण्याची सूचनाही त्यांनी केली.

****

उत्तराखंडमध्ये सुरु असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पेंटॅथलॉन मध्ये महाराष्ट्राच्या दीप्ती काळमेघ आणि सौरभ पाटील यांनी सुवर्ण पदक जिंकलं. ज्युदो मध्ये महिलांच्या ५२ किलो गटात राज्याच्या श्रद्धा चोपडे हिने सुवर्ण पदक पटकावलं, तर ४८ किलो वजनी गटात अकांक्षा शिंदेनं रौप्य पदक जिंकलं. जिम्नॅस्टिक्सच्या आर्टिस्टिक प्रकारात राज्याच्या महिला संघाला रौप्य पदक मिळालं. या स्पर्धेत ३३ सुवर्णांसह १२९ पदकं जिंकत महाराष्ट्र आता दुसऱ्या स्थानावर आला आहे. यामध्ये ४८ रौप्य आणि ४८ कांस्य पदकांचा समावेश आहे.

४७ सुवर्ण पदकांसह सेना दल पहिल्या, तर ३२ सुवर्ण पदकांसह कर्नाटक तिसऱ्या स्थानावर आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात विविध विकास कामांसाठी मंजूर १४१ कोटी १४ लाख रुपयांपैकी, १०५ कोटी १५ लाख रुपये विविध यंत्रणांना वितरित करण्यात आले आहेत. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत यापैकी ९८ कोटी ७७ लाख रुपये खर्च झाले आहेत. विकास कामांसाठी निधी खर्च करण्याची प्रक्रिया गतीमान करण्यात येत असून, निधी पूर्ण क्षमतेने वापरण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या वडवणी तालुक्यात वीजपुरवठा सुरळीत करावा या मागणीसाठी महावितरणच्या कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी काल आंदोलन केलं. वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्यानं शेतातील पिकांना पाणी देणं अवघड होत आहे. वीजपुरवठा सुरळीत झाला नाही तर आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही आंदोलक शेतकऱ्यांनी दिला.

****